**<u>दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ५८/२०१७ मधील नि. ५२ खालील आदेश</u>**

कृष्णा भिडे व.२ — अर्जदार

*विरुद्ध*

राधाकृष्ण मंदीर वैश्यसंस्था रत्नागिरी व.१२ — सामनेवाला

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदारांचे मुखत्यार आनंद कृष्णा भिडे यांनी अर्जदार नं. १ यांचे वारस म्हणून अभिलेखावर सामील करण्यास झालेला विलंब माफ होऊन मिळावा यासाठी केलेला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, अर्जदार नं. १ हे दि. १६ मे २०२० रोजी मयत झाले असून त्यांचे वारस याकामी रेकॉर्डवर घेणे आवश्यक बनले होते. परंतु दरम्यानच्या काळात कोरोना प्रादुर्भावामुळे अर्जदार नं. १ यांचे अन्य वारस रेकॉर्डवर आणणे हे दरम्यानच्या काळात कोर्ट कामकाज बंद असल्याने अशक्य झाले होते. त्याचप्रमाणे कोर्टाचे कामकाज सुरळीत चालू झाल्यानंतरच्या मागील नेमल्या तारखेस अर्जदार यांचे जवळचे नातेवाईक मयत झाल्याने अर्जदारचे मुखत्यांराना मे. न्यायालयात उपस्थित राहणे अशक्य झाले होते. त्यामुळे याकामी अर्जदार नं. १ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यास काही दिवसांचा विलंब झाला आहे. त्यामुळे सदरची तजवीज करणेचे राहून गेले होते. यामध्ये अर्जदार नं. २ व त्यांचे मुखत्यारांचा कोणताही गैरहेतू नव्हता. तरी वारस रेकॉर्डवर आणण्यास झालेला विलंब माफ होऊन मिळावा.

२. अर्जदाराने अर्जासोबत मयत कृष्णा पर्शुराम भिडे यांचा मृत्यु दाखला हजर केलेला आहे. या अर्जाकामी सामनेवालातर्फे प्रस्तुत अर्ज अर्जदार याने विलंबाने दाखल केला असून त्याबाबत दिलेले कारण हे योग्य नाही. सदर अर्जामध्ये नमूद कारण हे खोटे व खोडसाळ असून झालेल्या विलंबाबात मे. कोर्टाने योग्य तो आदेश करावा असे म्हणणे दाखल केलेले आहे.

३. अर्जाचे अवलोकन केले. अर्जदार व सामनेवालातर्फे वकिलांचा युक्तिवाद ऐकला. सदरकामी मूळ अर्ज अर्जदारांनी सामनेवाला संस्थेने दिवाणी अपील नं.

१९०/२०१२ मधील ताकीदीच्या आदेशाचा भंग केलेला असल्यामुळे सामनेवालांविरुध्द ताकीद होऊन मिळणेकरीता दाखल केलेला आहे. अर्जदार नं. १ हे दिनांक १६/०५/२०२० रोजी मयत आहेत. तर सदरचा अर्ज दि. १५/०२/२०२१ रोजी दाखल आहे. कोरोना काळात न्यायालयीन कामकाजात पडलेला खंड व त्यामुळे मुदतीच्या कायद्याची येणारी बाधा या अनुषंगाने मा. सर्वोच्च न्यायालयाने Suo Moto Writ Petition (Civil) No. 3/2020 मध्ये निर्देश पारीत केले असून त्यानुसार कोरोना काळात स्थगित प्रकरणांमध्ये दिनांक १५/०३/२०२१ पासून ९० दिवस किंवा त्यापेक्षा अधिक मुदत कायद्यातील तरतुदीनुसार उपलब्ध असेल तर अधिकची मुदत ग्राहय मानण्याची आहे. त्या अनुषंगाने दिनांक १५/०२/२०२१ रोजी दाखल प्रस्तुत अर्ज मुदतीत आहे. वादविषयाचे अंतिमतः निराकरण होणेकरीता अर्ज गुणदोषावर चालणे आवश्यक आहे. अर्जाचे कामी वाद विषयाचे अंतिम निराकरणाकरीता अर्जदार नं. १ च्या वारसांना अर्जाचे कामी संधी मिळणे न्यायाचे कारणे आवश्यक आहे. केवळ विलंब झाल्यामुळे अशी संधी नाकारणे न्यायोचित नाही. त्यामुळे झालेला विलंब माफ होवून मिळण्यास अर्जदार पात्र आहेत. सबब, खालील आदेश करण्यात येत आहे.

## **<u>आ दे श</u>**

अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

सही/-

दिनांकः- ०८/११/२०२१

(एम्.क्यु.एस्.एम्.शेख)

प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रत्नागिरी.